MHWS11001062-2026

# सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कारंजा (लाड) यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी पी. डी. देवरे)

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १४२/२०२६

१. **लताबाई रघुनाथ गोडसे**
वय अ. ५६ वर्ष, व्यवसाय – गृहिणी

२. **धिरज रघुनाथ गोडसे**
वय अ. ३६ वर्ष, व्यवसाय – नोकरी
अर्जदार क्र. १ व २ रा. माळीपुरा, कारंजा लाड
ता. कारंजा लाड, जि. वाशिम

३. **प्रियंका सचिन डवके**
वय अ. ३४ वर्ष, व्यवसाय – गृहिणी,
रा. रिध्दपुर, ता. मोर्शी, जि. अमरावती

४. **शुभम रघुनाथ गोडसे**
वय अ. ३२ वर्ष, व्यवसाय – नोकरी,
फलॅट नं. ०१, पहिला माळा, शारदा अपार्टमेंट,
हिरादेवी मंदिर जवळ, खारेगाव पखाली, कालवा, ठाणे
जि. ठाणे **....अर्जदार**

**– विरूध्द –**

**निरंक** **.... गैरअर्जदार**

दावा– **बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज**.

..........................................................................................................

अर्जदारांतर्फे मा. विधीज्ञ – **श्रीमती एम.व्ही. रऊत**

..........................................................................................................

दि.कि.अर्ज.क्र. १४२/२०२६

## निशाणी क्र.०१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांचा वारस दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे कथन खालीलप्रमाणे –**

मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांची अर्जदार क्र. १ ही विधवा पत्नी व अर्जदार क्र. २ ते ४ हे अपत्ये आहेत. मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांचा मृत्यु दिनांक १७/१२/२०२३ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर येथे झाला. ते कारंजा येथील कायमचे रहिवाशी होते. करिता अर्जदारांव्यतिरिक्त रघुनाथ सहदेव गोडसे यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारांना ते रघुनाथ सहदेव गोडसे यांचे वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस दाखला आवश्यक आहे. सबब, अर्जदारांनी ते रघुनाथ सहदेव गोडसे यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

४. निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत करुन दिनांक ०३/०७/२०२६ रोजीच्या 'दैनिक सायरन' निशाणी क्र. १५ या वर्तमानपत्रातुन जाहीर प्रगटन देवून तसेच जाहीरनाम्याद्वारे हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु अद्यापपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

५. अर्जदारांच्या कथनांवरून माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ बाबत –</u>**

६. सदर अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार क्र.०१ लताबाई यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक ०९ वर दाखल केले आहे. मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांचे मृत्यु दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र. १०, अर्जदारांच्या मुळ आधारकार्डवरुन पडताळणी केलेल्या आधारकार्डच्या प्रती अनुक्रमे निशाणी क्र. ११ ते १४ व 'दैनिक सायरन' या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र. १५ असे दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

७. जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत अर्जामध्ये कोणीही हजर झाले नाही, अगर आपली हरकत नोंदविलेली नाही. अर्जदार यांच्या वतीने त्यांच्या मा. विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

८. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार हे मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी दिलेला पुरावा हा विनाआव्हानीत राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत रघुनाथ सहदेव गोडसे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला देण्यात यावा.

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.08.05 17:40:37 +0530

दिनांकः ०५/०८/२०२६

**(पी. डी. देवरे)**

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कारंजा (लाड)

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | ---------- |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 05/08/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 05/08/2026 |
| Order uploaded on | :- | 05/08/2026 |